संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
2 - NOV 2018
प्राप्त झाले सही.....

**सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.**
**श्रीमती मनिषा मनोहर पाटील, लेखाधिकारी.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश :- संलेको-२०१८/ प्र.क्र.१९०/कोषा प्रशा -२
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २९ ऑक्टोबर, २०१८.

**संदर्भ** :-
१) वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०१६/प्र.क्र.१२१/कोषा प्रशा-२, दि.१४/०७/२०१६,
२) विशेष अधीक्षक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे आदेश क्र.मकृखोविम/(संकीर्ण-२०१६)/आ-७/२८४७, दि.२७/०७/२०१६,
३) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांचे कार्यालयीन आदेश क्र.ससंलेको/ अम/आस्था-२/म.वि.ले.से.अधिकारी प्रतिनियुक्ती/२९११/२०१६, दि.२४/०८/२०१६,
४) वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०१६/प्र.क्र.१८०/कोषा प्रशा-२, दि.१९/०९/२०१६,
५) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांचे आदेश क्र.ससंलेको/अम/ आस्था-२/म.वि.ले.से.अधिकारी प्रतिनियुक्ती/३६०१/२०१६, दि.२६/०९/२०१६,
६) कार्यालय जलस्वराज्य-२, जिल्हा परिषद, अमरावती यांचे आदेश क्र.जिप/ जलस्व-२/ आस्था/११५५/२०१६, दि.३०/०९/२०१६,

-: **शासन आदेश** :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखाधिकारी संवर्गातील श्रीमती मनिषा मनोहर पाटील, ह्या महाराष्ट्र कृष्णा खोरे, विकास महामंडळ, पुणे या कार्यालयातील लेखाधिकारी या पदावर कार्यरत असताना संदर्भ क्र.१ च्या शासन आदेशान्वये त्यांची बदली डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या पदावर करण्यात आली. त्यानुसार श्रीमती पाटील यांना संदर्भ क्र.२ च्या आदेशान्वये महाराष्ट्र कृष्णा खोरे, विकास महामंडळ, पुणे या कार्यालयातून बदलीच्या पदावर हजर होण्यासाठी दि.२९/०७/२०१६ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

२. श्रीमती पाटील या सदर पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी गेल्या असता, त्यांना डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या कार्यालयात रुजू करुन घेण्यात आले नाही. त्यामुळे संदर्भ क्र.३ च्या आदेशान्वये श्रीमती पाटील या दि.३०/०७/२०१६ (म.पू.) रोजी सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती या कार्यालयात हजर झाल्या आहेत.

कृ.मा.प.

३. तद्नंतर, श्रीमती पाटील या पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असताना, संदर्भ क्र.४ च्या शासन आदेशान्वये त्यांना लेखाधिकारी, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, अमरावती येथे पदस्थापना देण्यात आली. त्यानुसार संदर्भ क्र.५ च्या आदेशान्वये श्रीमती पाटील यांना पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती या कार्यालयातून दि.२६/०९/२०१६ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले. श्रीमती पाटील या दि.२७/०९/२०१६ (म.पू.) रोजी पदस्थापनेच्या पदावर हजर झाल्या. श्रीमती पाटील यांना दि.३०/०७/२०१६ ते दि.२६/०९/२०१६ पर्यंत एकूण ५९ दिवसांचा कालावधी पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. त्यामध्ये त्यांचा कोणताही सहभाग नाही.

४. यास्तव, श्रीमती पाटील यांना म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) च्या तरतूदीच्या अधीन राहून दि.३०/०७/२०१६ ते दि.२६/०९/२०१६ पर्यंत एकूण ५९ दिवसांचा कालावधी सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी म्हणून मंजूर करण्यास हरकत नसावी. सदर कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्यास सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(माधवी गांधी)
अवर सचिव, वित्त विभाग.

**प्रत :-**

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,*
३) अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) श्रीमती मनिषा मनोहर पाटील, लेखाधिकारी, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, अमरावती*
५) संबंधित अधिका-याचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
६) संबंधित अधिकारी - वैयक्तिक नस्ती*
७) निवड नस्ती, कोषा प्रशा - २
(संचालक, लेखा व कोषागारे मार्फत)*